**KOLHAPUR ENGINEERING ASSOCIATION**

कोल्हापूर इंजिनिअरिंग असोसिएशनचा अमृत महोत्सवी लोगोचे प्रकाशन




स्वातंत्रपुर्व काळात सन 1947 साली दि कोल्हापूर मेकॅनिकल इंजिनिअरिंग वक्र्सशाॅप ओनर्स युनियन स्थापन झाली. कोल्हापूरातील सर्वात पहिली स्थापन झालेल्या या संस्थेचे सन 1963 नाव बदलून कोल्हापूर इंजिनिअरिंग असोसिएशन करण्यात आले. या संस्थेने 74 वर्षे पुर्ण करून 75 व्या वर्षात येत्या दि.7 जुलै रोजी यशस्वी पर्दापण करित आहे.

या अमृत महोत्सवी वर्षाच्या प्रारंभी या संस्थेने अमृत महोत्सवी लोगो तयार केला आहे त्याचे प्रकाशन आज ज्येष्ठ उद्योगपती मा.श्री.बाबाभाई वसा यांचेहस्ते संपन्न झाले. कोरोना प्रतिबंधात्मक उपया म्हणून मोठा कार्यक्रम न करता कोरोना नियमांचे पालन करून फक्त संचालक मंडळ सदस्यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम करण्यात आला.

श्री.बाबाभाई वसासोा यांनी त्यांच्या मार्गदर्शन भाषणात म्हणाले की, मी भाग्यवान आहे कारण या संस्थेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षात मी चेअरमन होतो आणि आता 75 व्या वर्षी माझा हस्ते या लोगोचे प्रकाशन झाले याचा मनस्वी आनंद आहे. स्वातंत्रपुर्वीचा आणि नंतरचा काळही खुप आव्हानात्मक होता. परंतु येथील जिद्दी आणि कष्टाळू उद्योजकांमुळे अनेक समस्यावर मात करित उद्योग सुरू केले. संस्थान काळात ते विलीन होण्यापुर्वी उद्योगांसाठी जागा मिळवून तेथे उद्योग सुरू होण्यासाठी अथक परिश्रम जुन्या पिढीतील उद्योजकांनी केले. स्वर्गीय श्री.एस.ए.पाटील आणि श्री.वाय.पी.पोवार यांचे योगदान कदापी विसरता येणार नाहीत. स्वर्गीय श्री.एस.ए.पाटील यांनी त्यांच्याकडील दागिने गहान ठेवून उद्योजकांच्या प्लाॅटचे पैसे संस्थानकडे भरले आणि त्यामुळे ख-या अर्थाने उद्योगांचा प्रवास सुरू झाला. अशा उद्योजकांच्यामुळे आपली ही

मातृ संस्था उभा राहीली.  75 वर्षाचा काळ तसा मोठा काळ आहे.  अनेक चढउतार या कालावधीत सर्वांनी पाहिले. नवनविन तंत्रज्ञानाने उंची गाठली आहे आणि अजूनही नवनविन तंत्र येवू घातले आहे.  या काळातही आपली संस्था चांगले कामकाज करित आहे.  स्वर्गीय राम मेनन यांनी आंम्हास सतत मार्गदर्शन केले यामुळे आमच्यातील उद्योजकाता वाढीस लागली. सन 1975-76 मध्ये येथील उद्योजकांनी म्यानमार येथील कंपनीसी करार करून तेथील तंत्रज्ञान आत्मसात होणसाठी जपानलाही गेले.  या उद्योजकांना आणखिन साथ मिळाली असतीतर पहिला टॅक्टर ट्लिर हा कोल्हापूरात झाला असता परंतु ते शक्य झाले नाही अशी खंतही यावेळी श्री.वसासो यांनी व्यक्त केली.   इतिहासाचा अभ्यासकरून संचालक मंडळाने यापुढील कार्यही असेच सुरू ठेवून नविन उद्योजकांना प्रोत्साहीत करावे असे आवाहन केले. सन

कार्यक्रमाच्या सुरवातीस अध्यक्ष श्री.सचिन मेननसो यांनी उपस्थितांचे स्वागत केले.  प्रास्ताविकामध्ये ते म्हणाले की, आपल्या संस्थेने यशस्वीपणे 75 व्या वर्षात पदार्पण केले आहे.  याबद्दल सर्वांचे अभिनंदन केले. तसेच आजी माजी अध्यक्ष , संचालक आणि उद्योजक सभासदांचे स्मरण करून त्यांच्या कार्याचे कौतुक केले. स्वातंत्रपुर्व काळात अश्या प्रकारच्या संस्था सुरू करणे आणि उद्योजकांना एकत्रित करून चांगले व्यासपीठ तयार करणे हे खरोखरीच मोठे आव्हान होते.  प्रत्येक उद्योजक हा मोठा झाला पाहिजे, त्याला भेडसावणा-या समस्या सोडविण्यासाठी एकत्रित येवून

कामकाज केले.  पहिल्या पिढीतील उद्योजकांनी कोणतेही तांत्रिक ज्ञान नसतानाही आपल्या बुध्दीमत्तेच्या जोरावर एक उद्ष्टि ठेवून काम केलेमुळे आज आपण या उद्यमनगरिचा वटवृक्ष झाल्याचे पाहत आहोत.  जुन्या लोकांनी केलेले कार्य व इतिहास हा नेहमीच सर्वांना सांगितला पाहिजे त्यातून नविन उद्योजकांना एक उत्साह,प्रेरणा आणि संकट काळात ठेवायचा संयमही शिकवितो.  ज्येष्ठ उद्योगपती श्री.बाबाभाई वसा यांनी अशाच कामकाज सहभागी होवून या संस्थेसाठी मोलाचे योगदान दिले आणि येथील उद्योजकांना सतत मार्गदर्शन केले आहे.

श्री.श्रीकांत देसाई-ज्येष्ठ उद्योजक  यांनी इतिहासातील अनेक गोष्टींची माहिती दिली, संस्थान काळात प्लाट मिळणेसाठी केलेले कार्य, नविन तंत्र शिकण्यासाठी अनेक उद्योजकांनी तसेच बाबाभाई वसा यांनी केलेली मदत, मायक्रो मिटर सर्वप्रथम श्री.बाबाभाई वसा यांनी कोल्हापूरात आणले आणि उत्पादनातील दर्जा सुधारण्यास आणि वेळेची बचत करण्यास अनेकांना मदत केली.  अनेक बाळकडू जुन्या लोकांनी नवीन पिढीस दिल्यामुळे प्रगतीचा वेग वाढत गेला.  पुर्वीच्या काळी दर शुक्रवारी सर्वांची बिले एकत्रित करून पेमेंट करण्याची पध्दत होती त्यामुळे उद्योजकांना वेळेत पैसे मिळत आणि त्यामुळे पुढील कामकाजाचे नियोजन करता येणे शक्य होत. उद्योजकांच्या पाठिशी महिला वर्गही तितक्याच पध्दतीने काम करून उद्योजकांना सहकार्यकरित, सौ.वसा मॅडम यांनीही अनेक कामगारांचा वेळ आणि पैसा वाचावा म्हणून त्यांच्यासाठी जेवणाची व्यवस्था करून अनेकांचे आर्शिवाद घेतले हे कदापिही विसरता येणार नाही.

आमदार श्री.चंद्रकांत जाधव :- एखाद्या संस्थेतील उद्योजक संचालक हा किती उत्कृष्ट दर्जाचे काम करतो उद्योग विकास करण्यासाठी धडपडतो अनेक संकटांना सामोरे जातो त्याचे निराकरण करतो आणि संस्था कशी

प्रगतीपथावर राहील याची जबाबदारीने कामकाज करतो अश्या व्यक्तीमुळेच अश्या संस्था नेहमीच काळाच्या पुढे जावून काम करतात यासाठी संचालक मंडळातील सदस्य हे याविचाराचे असले पाहिजेत आणि आपली संस्थेतील संचालकांनीही असेच कामकाज करून संस्था चालविली,पुढे वाढविली आणि प्रगतीपथावर ठेवली. जुन्या लोकांनी व्हीजन ठेवून कामकाज केले त्यामुळे राजकोट आणि आग्रामधील उद्योजकही येथील उत्पादने घेवून जात असत. या मातृसंस्थेच्या अमृत महोत्सवाबद्दल सर्वांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या

श्री.श्रीकांत दुधाणे -संचालक :- आपली संस्था सातत्याने चांगले काम करित आहे. पुर्वीच्या परंपरा कायम ठेवून उद्योगात सातत्याने नविन गोष्टी आणण्यासाठी संस्था धडपडत आहे. याचा फायदा येथील उद्योजकांना होत आहे. ही परंपरा यासंस्थेने कायम ठेवावी असे आवाहन करून सर्व उद्योजकांना अमृत महोत्सवी वर्षाच्या शुभेच्छा दिल्या.

श्री.प्रकाश चरणे -ज्येष्ठ उद्योजक , या कार्यक्रमास माजी अध्यक्षांनाही आंमत्रित करून या आनंदामध्ये सहभागी केलेबद्दल संचालकांचे आभार मानले. सुर्वण महोत्सवी वर्षात त्यावेळी प्रदर्शन भरविले होते आणि विविध कार्यक्रम घेतले होते तसेच यासाठी कमिटीही स्थापन केली होती यापध्दतीने चांगले काम करू मी सतत मदत करण्यास तयार आहे. संचालक,सभासद उद्योजकांना शुभेच्छा दिल्या.

श्री.दिनेश बुधले .मानद सचिव :-

संस्थेच्या अमृत महोत्सवी वर्षाच्या सर्वांना शुभेच्छा दिल्या. संचालक मंडळ, आजी माजी अध्यक्ष, संचालक, सभासद यांच्या सहकार्यानेच आज ही संस्था चांगले काम करित आहे. दरवर्षी नवनविन उपक्रम राबवून सातत्यांने उद्योजकांच्या पाठीशी ही संस्था उभी राहीली आहे. छत्रपती शाहू महाराजांच्या दूरदृष्टीने आज येथे मोठया प्रमाणात उद्योग सुरू आहे. 42 एकर जागा उपलब्ध करून शाहू महाराजांनी उद्योगांना प्रोत्साहीत केले त्यांच्या या कार्यास वंदन केले. ही उद्यमनगरी उभी राहीली उद्योजकांना कामे मिळाली कामगारांना रोजगार मिळाला अनेकांचे संसार ही संस्था गेली अनेक वर्ष अविश्रांत सांभाळत आहे. अनेक कर्तबगार उद्योजकांचा वारसा या उद्योग नगरिस लाभला, स्वर्गीय श्री.एस.ए.पाटील, वाय.पी.पोवार यांचे पासून ते श्री.राम मेनन, रामप्रताप झंवर अश्या दिग्गजांनी ही उद्योग नगरी वाढविली. शिवाजी उद्यमनगर बरोबरच वाय.पी.पोवारनगर, पांजरपोळ त्यानंतर शिरोली, गोकूळशिरगांव,कागल एमआयडिसी असा मोठा वटवृक्ष तयार झाला आहे. या संस्थेच्या सहकार्याने कोल्हापूर उद्यम सोसायाटी, कोल्हापूर चेंबर, केआयडी कॉलेज, आणि इतर संस्थाचा जन्म झाला आणि वाढल्या. अमृत महोत्सवी वर्षात चांगले उपक्रम राबवू, मोठे उद्योगपतींना आमंत्रित करून येथील समस्थ उद्योजकांना चांगले मार्गदर्शन घडवू असे सांगितले. कोरोनाचा प्रसार थांबल्यावर टप्याटप्याने कार्यक्र घेवू . अमृत महोत्सवी लोगो प्रसिध्द कलाकार श्री.अनंत खासबागदार यांनी केला असून अत्यंत सुंदर लोगो झाला आहे. पुढील 25 वर्षे म्हणजे शतक महोत्सवी वर्षापर्यंत तो सर्वांना प्रेरणा देत राहील यात शंकानाही. या लोगोच्या डिझाईन बद्दल श्री.खासबागदार यांचे आभार मानले. सर्वच एकजुटीने कामकरण्याची ग्वाहीदिली आणि सर्व आजी माजी अध्यक्ष,संचालक,सभासद उद्योजक यांचे आभार मानले

आणि अमृत महोत्सवी वर्षाच्या शुभेच्छा दिल्या.  सर्व पत्रकार,वर्तमान पत्रे, इलेक्ट्ाॅनिक मिडीया यांचे आभार मानले आणि कार्यक्रम संपल्याचे जाहीर केले.

या प्रसंगी सर्वश्री.बाबाभाई वसा, सचिन मेनन, हर्षद दलाल,दिनेश बुधले, प्रसन्न तेरदाळकर,कमलाकांत कुलकर्णी, आमदार श्री.चंद्रकांत जाधव,श्रीकांत दुधाणे, रणजीत शाह, संजय अंगडी,नितीन वडीकर, बाबासो कोंडेकर, अतुल आरवाडे, अमर करांडे, जयदिप मांगोरे, अभिषेक सावेकर, सोहन शिरगांवकर, प्रकाश चरणे, श्रीकांत देसाई,प्रदीप व्हरांबळे इ.उपस्थित होते.




कोल्हापूर इंजिनिअरिंग असोसिएशन
उद्योगपती. माधवराव बुधले सभागृह
75